# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 27.01.2026 वार- मंगळवार

---

**<u>एसआयएटी</u>**

भारताला शाश्वत आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्थेकडे नेण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधनाची गरज आहे, असं प्रतिपादन केंद्रीय अवजड उद्योग आणि पोलाद मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी आज पुण्यात केलं. अवजड उद्योग मंत्रालयाच्या वतीने ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियातर्फे 'सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी-एसआयएटी 2026' या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन पुण्यात करण्यात आलं आहे. या परिषदेचं उद्घाटन कुमारस्वामी यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. एआरएआयचे संचालक आणि परिषदेचे अध्यक्ष डॉ. रेजी मथाई यावेळी उपस्थित होते. आत्मनिर्भर भारत मोहिमेअंतर्गत स्वदेशी बनावटीचे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधक आणि उद्योजकांनी प्रयत्न करावेत; पर्यायी इंधन, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत सुरक्षा प्रणाली यांसारख्या क्षेत्रात 'आत्मनिर्भर' होण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न करावेत, असं आवाहन कुमारस्वामी यांनी यावेळी केलं.

**<u>स्किल मिक्स</u>**

मातामृत्यू आणि बालमृत्यूचं प्रमाण कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे पुढच्या आठवड्यापासून ‘स्किल मिक्स’ हा उपक्रम सुरू केला जाणार आहे. पुणे, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांतील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये हा कार्यक्रम राबवला जाईल. सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये वेळेवर वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पुणे विभागातील प्रथम संदर्भ केंद्रे आणि सार्वजनिक रुग्णालयांमधील सुविधांची तफावत याचा अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात असल्याचं आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. भगवान पवार यांनी सांगितलं.

**<u>पीएमआरडीए</u>**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने 150 दिवसांच्या ई गव्हर्नन्स स्पर्धेत सर्वोत्तम शासकीय संस्था या गटातून राज्यात तृतीय क्रमांक, तर पुणे विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांची कामगिरी भारतीय गुणवत्ता परिषदेच्यावतीने तपासली गेली. यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालच्या प्रजासत्ताक दिनी केली. महानगर आयुक्त डॉ योगेश म्हसे यांच्या नेतृत्वाखाली पीएमआरडीएने ही कामगिरी केली आहे.

**<u>राष्ट्रवादी</u>**

पुणे महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी नगरसेवक निलेश निकम यांची आज निवड करण्यात आली. निकम महापालिकेत पाचव्यांदा निवडून आले असून यापूर्वी त्यांनी स्थायी समिती अध्यक्ष आणि सभागृह नेता म्हणून काम पाहिले आहे. महापालिकेत 119 नगरसेवकांसह भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा पक्ष असून त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे. त्यामुळे निकम यांची विरोधी पक्षनेतेपदाची निवड निश्चित मानली जात आहे.

**<u>साहित्य संमेलन</u>**

विवेक व्यासपीठासह विविध संस्थांच्यावतीनं पुण्यात येत्या 31 जानेवारी रोजी युवा साहित्य संमेलन आणि 1 फेब्रुवारी रोजी बालसाहित्य संमेलन रंगणार आहे. दोनही दिवस वैविध्यपूर्ण साहित्य प्रकारांसह कला-संगीताची अनोखी पर्वणी रसिकांना

विनामूल्य अनुभवता येईल, अशी माहिती आयोजकांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटर, इथं हे संमेलन होणार आहे.

**प्रयोगशाळा**

आळंदी इथल्या एनएफबीएम जागृती या अंध मुलींच्या विद्यालयात देशातील पहिली टॅक्टाइल गणित प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक महिंद्रा फाउंडेशनच्या सीएसआर उपक्रमातून उभारलेल्या या प्रयोगशाळेत दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना गणितीय संकल्पना अनुभवातून शिकता येणार आहेत. केंद्रीय प्राप्तिकर विभागाचे प्रधान आयुक्त संग्राम गायकवाड, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**चरकसंहिता**

आयुर्वेदातील आध्यात्मिक, धार्मिक आणि शास्त्रीय परंपरेचं जतन करणारा एक उपक्रम पुण्यातील प्राचीन संहिता गुरुकुलात आयोजित करण्यात आला होता. आयुर्वेदाचार्य वैद्य हरीश पाटणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात आयुर्वेदाच्या 50 विद्यार्थ्यांनी सलग आठ दिवस चरक संहितेचं पारायण केलं.

**महिला आयोग**

पुण्यातील सोरतापवाडी इथं झालेल्या दीप्ती चौधरी या विवाहितेच्या आत्महत्येच्या घटनेची महिला आयोगाने दखल घेतली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज दीप्ती यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केलं. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

**सुपर मास्टर्स गेम्स**

आठव्या मास्टर्स नॅशनल गेम्सचे आयोजन आजपासून पिंपरी चिंचवडमध्ये होत आहे. 31 जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत मैदानी खेळांबरोबरच भारोत्तोलन, बुद्धिबळ, डार्ट गेम, ज्युडो आणि कराटे तसच धनुर्विद्या या स्पर्धा होतील. या सर्व स्पर्धांमध्ये तीस वर्षांपुढील स्त्री, पुरुष सहभागी होत आहेत. देशभरातून पाच हजार पेक्षा जास्त नामांकित खेळाडू यात सहभाग घेतील.

**बिलीयर्डस्**

हरियाणामध्ये नुकत्याच पार पडलेल्या 92व्या राष्ट्रीय बिलीयर्डस् आणि स्नुकर अजिंक्यपद स्पर्धेत पुण्याच्या 15 वर्षीय आरव संचेती याने ऐतिहासिक कामगिरी करत कनिष्ठ, उपकनिष्ठ आणि स्नुकर या तीनही गटांमध्ये विजेतेपद संपादन करून तिहेरी मुकूट पटकावला. केवळ 15व्या वर्षी कनिष्ठ स्नुकर गटाचे विजेतेपद मिळणारा आरव देशातील पहिला खेळाडू ठरला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं, आज किमान तापमान 17 पूर्णांक 4 दशांश अंश; तर कमाल तापमान 31 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही दुपारनंतर आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**